# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः18.02.2025** **वारः मंगळवार**

---

- MSME उद्योगांसाठी विनातारण पत हमी योजनेचा प्रारंभ
- सीमा शुल्क विभाग देशाच्या प्रगतीमधला एक महत्वाचा धागा असल्याचं केंद्रिय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन
- राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ३ मार्चपासून, १० मार्चला अर्थसंकल्प सादर होणार
- आणि0
- 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त तयार केलेल्या संमेलन गीताचं राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**<u>अर्थमंत्री</u>**

केंद्र सरकार संरक्षण उत्पादन उद्योगांना पाठिंबा देत असून महाराष्ट्र संरक्षण उत्पादनाचं केंद्र म्हणून विकसित होत असल्याचं केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठीच्या म्हणजेच MSME साठीच्या परस्पर पत हमी योजनेचा प्रारंभ काल मुंबईत सीतारामन यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. गेल्या तीन अर्थसंकल्पांमध्ये MSME साठीच्या सोई सुविधांवर भर देण्यात आला आहे. आता या योजनेद्वारे MSME उद्योगांना यंत्रसामुग्री अथवा अन्य साधनांच्या खरेदीसाठी शंभर कोटी रुपयांपर्यंतच्या विनातारण कर्जाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षमतेविषयी बोलताना त्या म्हणाल्या,

यावेळी या योजनेसाठी पात्र MSME उद्योगांना मंजुरीपत्रांचं वितरण सीतारामन यांनी केलं. तसंच स्वामीह निधीचा लाभ घेतलेल्या घर खरेदीदारांना त्यांनी घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या.

**<u>सीतारामनसीमाशुल्क</u>**

सीमा शुल्क विभाग देशाच्या प्रगतीमधला एक महत्वाचा धागा आहे. देशाच्या सुरक्षेसाठी काम करणारे हे सैनिकच असून त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि सुरक्षेसाठी दिलेलं योगदान महत्त्वाचं आहे अशा शब्दांत केंद्रिय मंत्री निर्मला सीतारामन यांनी सीमा सुरक्षा दलाचा गौरव केला. आंतरराष्ट्रीय सीमा शुल्क दिनानिमित्त उरण इथं आयोजित एका विशेष कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सीमाशुल्क विभागाच्या २० अधिकाऱ्यांना यावेळी सन्मानित करण्यात आलं.

**<u>निवडणूक</u>**

देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांची निवड झाली आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा कार्यकाळ आज संपत आहे. ज्ञानेश कुमार हे १९८८च्या केरळ तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. डॉ विवेक जोशी यांची नवे निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते १९८९ सालच्या हरियाणा तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी या दोघांच्याही नावावर शिक्कामोर्तब केलं आहे.

**<u>अधिवेशन</u>**

राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ३ मार्चपासून सुरू होणार आहे. पहिल्या दिवशी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर राज्यपालांचं अभिभाषण होईल. १० मार्च रोजी अर्थमंत्री अजित पवार राज्याचा अर्थसंकल्प सादर करतील.

**<u>मुख्यमंत्री</u>**

मंदिरं ही श्रद्धेची स्थानं तर आहेतच. पण, ती पूर्वीसारखीच पुन्हा सामाजिक समतेची केंद्र व्हावीत, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. तिरुपती इथं आयोजित आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद आणि प्रदर्शनात ते काल बोलत होते. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, आचार्य गोविंददेव गिरी महाराज, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. परकीय आक्रमणांच्या काळात देशभरात मंदिर आणि घाटांचं पुनर्निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं हे ३००वं जयंतीवर्ष आहे; त्यावर्षात हे आयोजन होत आहे, हा अतिशय चांगला योग आहे, असं फडणवीस म्हणाले.

**<u>एमएसपीसमिती</u>**

प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान अर्थात पीएम आशा योजनेअंतर्गत शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी काल राज्य सरकारनं एका समितीची स्थापना केली. ही समिती सध्या अस्तित्वात असलेल्या यंत्रणेचं मूल्यांकन करेल आणि राज्यभरात हमीभावाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी यासाठी धोरणांची शिफारस करेल. महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक या समितीचे अध्यक्ष असतील तर नाफेडचे मुंबईतले व्यवस्थापकीय संचालक, नाफेडचे पुण्यातले वितरण संचालक, पुण्यातल्या राज्य कृषी विपणन मंडळाचे मुख्य विपणन अधिकारी या समितीचे सदस्य असतील.

**<u>साहित्य संमेलन गीत</u>**

98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला येत्या शुक्रवारपासून नवी दिल्लीत सुरुवात होत आहे. यासाठी ताल कटोरा मैदानावर छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी उभारण्यात आली असून इथल्या विविध सभामंडपांना महाराष्ट्राल्या महान व्यक्तीमत्वांची नावं देण्यात आली आहेत. २१ ते २३ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या संमेलनात कवी संमेलन ,मुलाखत, परिसंवाद असे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

या संमेलनानिमित्त तयार करण्यात आलेल्या आम्ही असू अभिजात या संमेलन गीताचं प्रकाशन काल मुंबईत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झालं. मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि या गीताचे गीतकार डॉ. अमोल देवळेकर, संगीतकार आनंदी विकास, गायक मंगेश बोरगावकर, समन्वयक विकास सोनताटे, तसंच सरहद संस्थेचे सदस्य यावेळी उपस्थित होते.  ऐकूया या गीताची एक झलक,

**<u>शिवजन्मोत्सव</u>**

पुण्यात महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीनं आंबेगाव ब्रुद्रुक इथं साकारत असलेल्या शिवसृष्टीचा दुसरा टप्प्याचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्याच्या शिवजयंतीला होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. शिवजयंती महोत्सव समितीतर्फे उद्या सकाळी लालमहालातून शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा या मिरवणुकीचंही आयोजन करण्यात आलं आहे.

शिवजयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे स्वराज्य सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे.

येत्या २७ फेब्रुवारीपर्यंत साजऱ्या होणाऱ्या सप्ताहादरम्यान शोभायात्रा, व्याख्यान, चित्र आणि पुस्तकांचे प्रदर्शन, शिवकालीन वस्तूंचे प्रदर्शन तसंच किल्ले, गडकोट आणि दुर्ग स्वच्छता मोहीम इत्यादी कार्यक्रम होणार आहेत. अशी माहिती पक्षाचे मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.

**<u>धम्मपरिषद</u>**

राज्यातल्या अनुसूचित जातीच्या 25 हजार विद्यार्थ्यांसाठी विविध ठिकाणी वसतिगृह उभारणार असून, यात नांदेड जिल्ह्यातल्या किनवट, माहूर आणि हिमायतनगरचा समावेश असेल, अशी घोषणा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी नुकतीच किनवट इथं केली. किनवट इथं आयोजित चौदाव्या जागतिक धम्म परिषदेत ते बोलत होते.

**<u>हवामान</u>**

आज राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.